# नाशिक महानगरपालिका, नाशिक

सामान्य प्रशासन विभाग

राजीव गांधी भवन, शरणपूर रोड, नाशिक - ४२२००२

फोन नं. 0253 2222416 Email ID: dmc_gad@nmc.gov.in


नामनपा जाहिरात क्र.०१/२०२५ दिनांक २८/१०/२०२५

## -: नाशिक महानगरपालिका पदभरती:-

नाशिक महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील गट-क मधील अभियांत्रिकी संवर्गातील रिक्त पदे सरळसेवा भरती प्रक्रियेद्वारे भरण्यासाठी, प्रस्तुत जाहिरातील नमूद केलेप्रमाणे पदांची शैक्षणिक अर्हता व इतर अटी शर्तींची पुर्तता करणाऱ्या पात्र उमेदवारांकडून Online पद्धतीने अर्ज मागविण्यात येत आहेत.

प्रस्तुत जाहिरातीमधील पदे ही अभियांत्रिकी सेवेमधील आहेत. सदर भरतीसाठी पुरेसा प्रतिसाद प्राप्त होण्याकरीता जाहिरात देण्यात येत आहे. सदर जाहिरातीनुसार गट 'क' मधील एकूण ११४ पदांकरीता अर्ज करण्याचा कालावधी दिनांक १०/११/२०२५ पासून ते दिनांक ०१/१२/२०२५ रोजी पर्यंत आहे. इच्छुक उमेदवारांनी www.nmc.gov.in या संकेतस्थळावर दिनांक १०/११/२०२५ पासून ते दिनांक ०१/१२/२०२५ या दिवशी रात्री ११.५५ वाजेपर्यंत Online पद्धतीने अर्ज करावेत. प्रस्तुत जाहिरातीच्या अनुषंगाने भरावयाचे पदाचे पदनाम, वेतनश्रेणी, पदसंख्या याचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | पदनाम | वर्ग | ७ व्या वेतन आयोगानुसार वेतनश्रेणी | पद संख्या |
|---|---|---|---|---|
| १ | सहाय्यक अभियंता (विद्युत) | क | S-१५, ४१८००-१३२३०० | ३ |
| २ | सहाय्यक अभियंता (स्थापत्य) | क | S-१५, ४१८००-१३२३०० | १५ |
| ३ | सहाय्यक अभियंता (यांत्रिकी) | क | S-१५, ४१८००-१३२३०० | ४ |
| ४ | कनिष्ठ अभियंता (विद्युत) | क | S-१४, ३८६००-१२२८०० | ७ |
| ५ | कनिष्ठ अभियंता(स्थापत्य) | क | S-१४, ३८६००-१२२८०० | ४६ |
| ६ | कनिष्ठ अभियंता (यांत्रिकी) | क | S-१४, ३८६००-१२२८०० | ९ |
| ७ | कनिष्ठ अभियंता (वाहतूक) | क | S-१४, ३८६००-१२२८०० | ३ |
| ८ | सहाय्यक कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) | क | S-१०, २९२००-९२३०० | २४ |
| ९ | सहाय्यक कनिष्ठ अभियंता (विद्युत) | क | S-१०, २९२००-९२३०० | ३ |

### ऑनलाईन अर्ज भरण्यासाठी वेळापत्रक

| अ.क्र. | तपशील | दिनांक |
|---|---|---|
| १ | ऑनलाईन पद्धतीने अर्ज नोंदणी सुरु होण्याचा दिनांक | दि.१०/११/२०२५ |
| २ | ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करण्याचा अंतिम दिनांक | दि.०१/१२/२०२५, वेळ रात्री ११.५५ पर्यंत |
| ३ | ऑनलाईन पद्धतीने परीक्षा शुल्क भरणेची अंतिम मुदत | दि.०१/१२/२०२५ |
| ४ | परीक्षेसाठी ऑनलाईन प्रवेशपत्र उपलब्ध होण्याचा दिनांक | परीक्षेच्या ७ दिवस आधी |
| ५ | ऑनलाईन परीक्षेचा दिनांक (प्रवेश पत्रात नमूद केल्यानुसार) | नाशिक महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर उपलब्ध असेल. |

*** परीक्षा शुल्क :-**

| आकारण्यात येणारे शुल्क | |
|---|---|
| खुला प्रवर्ग | मागास प्रवर्ग व अनाथ प्रवर्ग |
| ₹१,०००/- | ₹९००/- |

Mahabharti.in